# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०१ जुलै २०१५

## मुंबई विद्यापीठाचे “डिजीटल” पाऊल

## मुंबई विद्यापीठाचे अद्ययावत संकेतस्थळ आणि मोबाईल एप्स

मुंबई- आज पासून सुरु झालेल्या डिजीटल इंडिया वीकच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकत नविन अद्ययावत संकेतस्थळ आणि मोबाईल एप्स तसेच अत्याधुनिक सोयी सुविधेने युक्त असलेल्या डेटा सेंटरचे अनावरण करण्यात आले.मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांच्या हस्ते आज आभासी वर्गखोलीमध्ये विद्यापीठाचे नविन संकेतस्थळ,मोबाईल एप्स आणि डेटा सेंटरचे उद्घघाटन करण्यात आले.

डिजीटल इंडियाच्या वीकच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना सहजरित्या माहितीचे स्त्रोत उपलब्ध करुन दिले आहे.यामध्ये प्रामुख्याने प्रत्येकाला घरबसल्या स्मार्टफोनवर एका क्लीकमध्ये माहिती उपबध्द होणार आहे.त्याचप्रमाणे अद्ययावत संकेतस्थळाच्या माध्यमातून विद्यापीठ विभाग,सलंग्नित महाविद्यालयांची माहीतीही उपलब्ध होणार आहे.

हे स्मार्ट मोबाईल एप्स विद्यापीठाने तयार केले असून त्याला अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड दिली आहे.हे एप्स विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येणार असून,त्याची लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे,या एप्सचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे सहजरित्या विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया,परिक्षा अर्ज,हॉलतिकिट,आसनव्यवस्था,वेळापत्रक,निकाल,पुनर्मुल्यांकनाचे निकाल,अभ्यासक्रम,विविध कोर्सेस,दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्रवेश,निकाल ,विविध चर्चासत्र आणि विद्यापीठाविषयीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.त्याचजोडीला विद्यार्थ्यांना महत्वाची परिपत्रके सुध्दा उपलद्ध करुन देण्यात आली आहे.तर येत्या काही दिवसात या प्लेटफॉर्मच्या मदतीने मॅप्स आणि दिशा आणि ऑनलाईल पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.विद्यापीठाचे हे अधिकृत मोबाईल एप्स असून ते एंड्रॉईड प्लॅटफॉर्मवर कार्यरत असणार आहे.

तर याच जोडीला मुंबई विद्यापीठाचे अद्ययावत संकेतस्थळ सुध्दा आजपासून सुरु करण्यात आले आहे.या संकेतस्थळाची वैशिष्ट्ये म्हणजे हे संकेतस्थळ अत्यंत सुबक,सुटसुटीत माहीती,जलद गतीने चालणारे असून ते मोबाईलफोनवर सुध्दा ऑपरेट केले जाऊ शकते.हे संकेतस्थळ बनवितांना पासवर्ड प्रोटेक्शन आणि सुरक्षिततेचे निकष पाळले आहेत.हे नविन संकेतस्थळ इंग्रजी आणि मराठी या  दोन्ही भाषेत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.विशेष म्हणजे या संकेतस्थळावरुन थेट ट्वीटर,फेसबुक आणि गुगल प्लस यासारख्या सोशल मिडियाशी कनेक्ट करण्यात आले आहे.मुंबई विद्यापीठाचे विभाग,सलंग्नित महाविद्यालये,विविध महाविद्यालयात चालविण्यात येणारे कोर्सेस,विद्यापीठाचे कोर्सेच,परिक्षेचे वेळापत्रक,निकाल,पुनर्मुल्यांकनाचे स्टेटस,आसनव्यवस्था,परिपत्रके इत्यादी माहतीचे संकलन करुन सहजरित्या ते कोणालाही उपलब्ध होऊ शकणार आहेत.हे अद्ययावत संकेतस्थळ लाईटवेट असून जुन्या संकेतस्थळाच्या तुलनेने अधिक जलदगतीने रन होणारे आहे.फोटो गॅलेरी,व्हिडीओ,चर्चासत्र,लेक्चर्स,विद्यापीठातील विविध कार्यक्रम यांचीही माहिती मीडिया पोर्टलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

विद्यापीठाने स्वत:चे डेटा सेंटर तयार केले असून त्याच्या माध्यमातून विद्यापीठातील माहिती आणि तंत्रज्ञान,सर्व्हर,आणि खाजगी क्लाऊड सेंटर तयार करुन तंत्रज्ञानाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे.

कोट- " माहिती तंत्रज्ञानाच्या युगात डिजीटल एम्पॉवरमेंट ही काळाची गरज असून मुंबई विद्यापीठाने त्यादृष्टीने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.विद्यापीठाचे मोबाईल एप्स आणि अद्ययावत संकेतस्थळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहज आणि जलदगतीने माहिती उपलब्ध होणार असून त्याचा त्यांना नक्कीच फायदा होणार आहे."

डॉ.राजन वेळूकर,कुलगुरु,मुंबई विद्यापीठ

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव ,(जनसंपर्क)0